सन २०१७-१८ या वित्तिय वर्षात रुग्णालय तत्त्वावरील स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः कुनिका २०१७/प्र क्र २३४ /आरोग्य -५
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ८ व १० वा मजला, मुंबई
तारीख: ०५ डिसेंबर, २०१७

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः कुनिका२०११/प्र क्र ३२१/ आरोग्य-५, दिनांक २१ मार्च, २०१२

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७.

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून,२०१७.

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः कुनिका २०१७/प्र क्र २३४/ आरोग्य-५, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१७

५) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ व क्षय) यांचे पत्र क्र.ससंआसे/कुष्ठ व क्षय/कक्ष-१०२/अनुदान १६३५९-६१/२०१७, दि.०४/०९/२०१७.

६) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, यांचे शिफारस पत्र क्र.संआसे/कुष्ठरोगसहा अनुदान /रुग्णालयतत्वावरील/स्वसेसंअनु/मंजूर/प्रस्ताव/कक्ष-१८/४२८५-८६/२०१६, दि.०८/११/२०१७.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन निर्णयानुसार रुग्णालय तत्त्वावरील कुष्ठरुग्णांसाठी रु.२,२००/- प्रमाणे प्रतीरुग्ण व दरमहा संस्थेने प्रत्यक्ष भरती केलेल्या रुग्णांप्रमाणे अनुदान देण्यात येते. संदर्भाधीन क्र.६ अन्वये प्राप्त प्रस्तावानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये रुग्णालय तत्वावरील कुष्ठरुग्णांसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

रुग्णालय तत्त्वावरील स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदाने देण्यासाठी ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रु.४,००,००,०००/-(चार कोटी) इतके सहायक अनुदान (योजनेतर) सन २०१७-१८ या वर्षाकरीता अर्थसंकल्पित करण्यात आले आहे. सदर अनुदानातून संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ४ अन्वये नमूद स्वयंसेवी संस्थांना रु.५१,०६,००० /- (रुपये एकावन्न लाख सहा हजार फक्त) इतके सहायक अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे..

२.   सन २०१७-१८ या वर्षाकरीता मागणी क्रमांक आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य (०१)(१२) कुष्ठरोग्यांना प्रतिव्यक्ती अनुदाने देण्यासाठी सहायक अनुदान (२२१० ०६८३) या लेखाशिर्षाखाली ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रु.४,००,००,०००/-(चार कोटी) इतके अनुदान उपलब्ध झालेले आहे. वित्त विभागाच्या दि. ३० जून २०१७ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना चालू वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी निधी वितरणापैकी (डिसेंबर २०१७ अखेर) महसूली लेख्यातील निधी ७० टक्के इतक्या मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

प्राप्त अनुदानापैकी ७० टक्के म्हणजेच रु.२,८०,००,०००/- (रु.दोन कोटी ऐंशी लाख) इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. उपलब्ध अनुदानातून रु.५१,०६,०००/- वजा जाता रु.२,२८,९४,०००/- (रु.दोन कोटी अठ्ठावीस लाख चौ-याण्णव हजार फक्त) इतके अनुदान शिल्लक आहे. सदंर्भाधीन क्र.६ अन्वये प्राप्त प्रस्तावानुसार खाली दर्शविल्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थांना एकूण रु२.,२०,११,.इतके सहायक अनुदान दि (अकरा हजार सहाशे तेरा फक्त ,वीस हजार ,दोन कोटी.रु)-/६१३२१ मार्च,२०१२ च्या शासन निर्णयातील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे .

अ.क्र	संस्थेचे नाव	कालावधी	प्रत्यक्ष हजर रुग्ण	देय अनुदान
१.	महारोगी सेवा समिती आनंदवन,वरोरा, जि.चंद्रपूर	ऑक्टोबर २०१६ ते जून २०१७	५४००	रु.१,१८,८०,०००/-
२.	कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, नेरे, जि.रायगड	ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७	१४९	रु.२,४२,६६५/-
३.	लेप्रसी हॉस्पिटल सोलापूर, म.न.पा.संचालित	जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६	७४९	रु.१०,२४,२१८/-
४.	कुष्ठरोग दवाखाना वडोली, ता.तलासरी,जि.ठाणे	एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७	४२८	रु.९,४३,८००/-
५.	अहमदनगर जिल्हा कुष्ठरोग निवारण समिती, जि.अहमदनगर	एप्रिल २०१६ ते डिसेंबर २०१६	२०२	रु.४,३२,४१२/-
६.	महात्मा गांधी शिक्षण संस्था, चावर्दा, जि.बुलढाणा	ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७	९०	रु.१,९८,०००/-
७.	दि लेप्रसी मिशन कोठारा लेप्रसी हॉस्पिटल,ता.अचलपूर जि.अमरावती	जुलै २०१६ ते जून २०१७	९७१	रु.११,८५,७२८/-
८.	लेप्रसी ॲन्ड रिहॅबिलीटेशन सेंटर निंभोरा,जि.अमरावती,	जुलै २०१६ ते जून २०१७	२८१	रु.५,१६,७५४/-
९.	विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन, जि.अमरावती	जुलै २०१६ ते जून २०१७	१६७२	रु.३४,४६,६६६/-
१०.	महारोगी सेवा समिती, दत्तपूर, जि.वर्धा	एप्रिल २०१६ ते मार्च २०१७	६९०	रु.१४,६८,६७५/-

११.	एडलजी फेमजी ऑलब्लेस निरामय निकेतन, ट्रस्ट, मुंबई	जुलै २०१६ ते जून २०१७	१०८	रु.२,१९,४३९/-
१२.	मराठवाडा लोकसेवा मंडळ नेरली, जि.नांदेड	जानेवारी २०१६ ते मार्च २०१७	२२७	रु.४,५३,२५६/-
	एकूण		१०९६७	रु.२,२०,११,६१३ /-

३. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ मध्ये नमूद केल्यानुसार योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्यास तसेच खर्चासाठी तरतूद उपलब्ध असल्यास व खर्च मंजूरीचे विभागास वित्तीय अधिकार असल्यास वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही. तसेच परिपत्रकात नमूद केल्यानुसार स्वयंसेवी संस्थेचे मागील अनुदान खर्चासंबंधातील उपयोगिता प्रमाणपत्र व संबंधित स्वयंसेवी संस्थेचा सनदी लेखापालाचा लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यामुळे विभागीय स्तरावर प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नसावी.

४. सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात रुग्णालय तत्त्वावरील स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरणाचा प्रस्ताव, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०१७ निधी वितरणाबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ सोबतच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.८ समोर नमूद तपासणीसूचीनुसार तपासला असून मुद्दा क्र.३ ते ९ मधील सर्व अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील सर्व अटींची पुर्तता होत आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार, सन २०१६-१७ या वित्तिय वर्षात रुग्णालय तत्त्वावरील स्वयंसेवी संस्थांना यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षण /महालेखापाल यांचे गंभीर आक्षेप नाहीत. या योजनेंतर्गतचा निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होत नाही. सदर योजनेंतर्गत वस्तू खरेदी प्रस्तावात खरेदी नियोजन करण्यात येते व आवश्यकतेनुसार दरकरारावर खरेदी करण्यात येते. तसेच भांडवली वस्तूंच्या खरेदीनंतर डेड स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येते. सदर योजनेच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. सहसंचालक (कुष्ठ व क्षय), पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यांनी वरील अटी पुर्ण केल्याची खातरजमा करुन संबंधित अनुदान अदा करण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर अनुदानाशी संबंधित देयके अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे सादर करणेसाठी सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च करु नये व खर्चाचा ताळमेळ घालून अहवाल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

६. याबाबतचा खर्च मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य (०१)(१२) कुष्ठरोग्यांना प्रतिव्यक्ती अनुदाने देण्यासाठी सहायक अनुदान (२२१० ०६८३), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू वित्तीय वर्षाच्या मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये त्या विभागाने प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०५१६०७२१९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sharad B. Londhe

Digitally signed by Sharad B. Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e038ee7c6ac263e1303d706aa39454325a34dab73c10b2ea6c33253bbc05235e, cn=Sharad B. Londhe
Date: 2017.12.12 11:29:18 +05'30'

(श.बा.लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१)महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखावअनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई.

२)जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

४)निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

५)संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

६)सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ व क्षय), पुणे

७)सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.

८)वित्तविभाग, (व्यय.१३) मंत्रालय, मुंबई.

९)सार्वजनिक आरोग्य विभाग, (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई/निवडनस्ती (आरोग्य-५)